ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी

विनाअनुदान तत्वावर आवक क्र ५१२४/२२ दि. २५/१२/२००१ २६५०९७१

[redacted]

जा.क्र प्राशि/खाप्राशा/वर्ग-तुकडी/मंजूरी/पुवि/०१
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय
दिनांक : 13 DEC 2001

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,
२. शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.
३. प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/[redacted] शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड, पुणे-१८.

<u>विषय</u> : मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/[redacted] खाजगी प्राथमिक शाळेस सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षी [redacted]/अतिरिक्त [redacted] वर्गाच्या [redacted]/तुकडया मंजूर करणेबाबत.

संदर्भ : प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे क्र खाप्राशा/२०००/तुमा-२/८००७२/क्र-५१२, दिनांक २९.११.२००१

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा विचार करता उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या [redacted]/अतिरिक्त [redacted] वर्गाच्या [redacted] तुकड्या [redacted] विनाअनुदान/[redacted] तत्वावर जून, २००० पासून सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत [redacted]/आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी वाढ. नैसर्गिक/अतिरिक्त |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | |
| १. | ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी, जि. पुणे. | मराठी. | इ. २ री वी ३ री तुकडी. | अतिरिक्त. |

<u>अटी व शर्ती.</u>

१. ज्या शाळांना जून, २००० पासून विनाअनुदान तत्वावर वर्ग/तुकडया मंजूरी देण्यात आलेली आहे या वर्ग/तुकडया भविष्यात जून, २००४ पासून अनुदानास पात्र ठरविताना शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण/एस २०००/(२४५५)/प्राशि-१, दिनांक ८.११.२००० मधील अटी व निकषांचा अवलंब करावा व अनुदानास पात्र ठरणा-या या वर्गाला/तुकडयांना आवश्यक असणारी आर्थिक तरतूदीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे त्यावर्षी उपलब्ध करुन घेण्याची दक्षता संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद/शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ यांनी घ्यावी.
२. शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
३. सदर शाळेने वर्ग/तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन घ्याव्यात.
४. सदर शाळेत स्वच्छतागृहांची व पिण्याच्या पाण्याची सुविधा यामत्ती असणे आवश्यक आहे.
५. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
६. सदर मंजूर करण्यात येणा-या वर्ग/तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळेतील पट व उपस्थितीवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
७. सदर शाळेच्या मंजूर करण्यात आलेल्या या वर्ग/तुकडीत विद्यार्थी संख्या कायम पुरेशी असणे आवश्यक आहे.
८. तपासणी अंती एक जरी अट अथवा शर्त नियमबाह्य निदर्शनास आल्यास वर्ग/तुकडी मंजूरी रद्द करण्यात येईल.

मळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

शिक्षण उपसंचालक करिता
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
१. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-१
२. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी, जि. पुणे.

२९/१२
वा.ना.अ.